डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
अर्थ प्रशासन विभागच
पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)
दुरध्वनीः- ०७२४२२५८४६९
नियंत्रक ई-मेल :comptroller@pdkv.ac.in फॅक्स :- ०७२४-२२५८८७३

स्मरणपत्र -१ ६८०
जा.क्र.अप्रवि/अलेप/ /२०२३ दिनांकः २० /०७/२०२३
प्रति,

नियंत्रण अधिकारी/ विभागप्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला / नागपूर

**विषयः** प्रलंबित लेखा परिक्षण आक्षेपांच्या पुर्ततेबाबत.
**संदर्भ :** १) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.अप्रवि/अलेप/ ८३ /२०२३,दिनांकः २८/०४/२०२३.
२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.अप्रवि/अलेप/ २०३ /२०२३,दिनांकः २९/०५/२०२३.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने, विद्यापीठातील विविध महाविद्यालये, विद्यालये, संशोधन केंद्रे, संलग्न संस्था व तसेच विविध योजना व कार्यालय यांचे सन १९७४-७५ पासुनच्या निकाली न निघालेल्या लेखा परिक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन नियंत्रक कार्यालयात सादर करुन निकाली काढण्यास्तव कळविण्यात आले होते.

परंतु अद्यापपर्यंत बरेचशे महाविद्यालये, विद्यालये, संशोधन केंद्रे, संलग्न संस्था व तसेच योजना व कार्यालय येथील आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयालयांचे प्रलंबित लेखा परिच्छेदांचे अनुपालन नियंत्रक कार्यालयाच्या अंतर्गत लेखा परिक्षण कक्षास तपासणी करण्यासस्तव सादर करण्यात आलेले नाहीत.

करीता आपणास पुन्हा या पत्रान्वये कळविण्यात येते की, ज्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या कार्यालयाचे लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद प्रलंबित आहेत त्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी लवकरात लवकर लेखा परिच्छेदांचे अनुपालन अंतर्गत लेखा परिक्षण कक्षातील अधिकारी यांच्या कडे तपासणी करीता सादर करावेत तेसच ज्या कार्यालयाकडे लेखा आक्षेप परिच्छेद उपलब्ध नसतील अशा कार्यालयांनी अंतर्गत लेखा परिक्षण कक्षातील अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावेत, जेणे करुन आगामी होणाऱ्या लेखा आक्षेप पुर्तता समितीमध्ये सदर परिच्छेद ठेवून त्या परिच्छेदावरील आक्षेप खारीज करता येईल व प्रलंबित परिच्छेदांची संख्या कमी होऊन त्या बाबतची माहिती शासनास कळविता येईल.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रतीलिपी :
१) कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक यांना मा.कुलगुरु, डॉ. पं.दे. कृ. वि., अकोला यांच्या माहिती करीता.
२) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.
३) प्रभारी अधिकारी,संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता